


हरिवंशरायजींचं जीवनः एक आनंदोत्सव

हरिवंशराय यांचं खरं आडनाव श्रीवास्तव. कायस्थ ब्राह्मण. त्यांनी आपल्या नावासोबत बच्चन हे उपनाम जोडून कविता प्रकाशित करायला सुरुवात केली आणि १९३०च्या दशकापासून हिंदी काव्यजगतात जणू बच्चन युगालाच सुरुवात झाली.

त्यानंतर थोड्याच कालावधीत हिंदी कवींमध्ये बच्चन यांचं नाव वरच्या श्रेणीत जाऊन बसलं आणि चार दशकांनंतर हिंदी चित्रपटसृष्टीत पुन्हा एकदा बच्चन या नावाने आपली किमया दाखवली.


काव्यजगतात शिखरावर जाऊन पोहोचलेल्या हरिवंशराय बच्चन यांचे सुपुत्र अमिताभने चित्रपट जगतात तीच लोकप्रियता मिळवली हे विशेष! जुन्या पिढीच्या हिंदी भाषिकांच्या मते आज फिल्मसृष्टीत जी लोकप्रियता अमिताभने मिळवली त्यापेक्षा कितीतरी अधिक लोकप्रियता स्वातंत्र्यपूर्व दशकांत हिंदी भाषिकांमध्ये कवी म्हणून हरिवंशराय यांना लाभली होती.

१९०७ मध्ये जन्मलेल्या हरिवंशरायजींनी १८ जानेवारी २००३ रोजी वयाच्या ९६व्या वर्षी चिरनिद्रा घेतली. हिंदी भाषेच्या अभ्यासकांच्या मते त्यांची योग्यता तुलसीदासांच्या तोडीची होती तर काहींनी त्यांना ओमर खय्यामच्या पंक्तीत बसवलं.

आपल्या सर्वाधिक लोकप्रिय 'मधुशाला' या काव्यसंग्रहावर ओमर खय्यामच्या 'रुबाई'चा प्रभाव असल्याचं सत्य प्रांजळपणे स्वीकारताना हरिवंशरायजींना तो स्वतःचा गौरव वाटत असे. प्रत्यक्षात खय्यामच्या 'रुबाई'चा हिंदीत अनुवाद करण्याचा प्रयत्नही हरिवंशरायजींनी केला होता.

आयुष्य आनंदाने जगण्याची प्रेरणा देणाऱ्या बच्चनजींच्या कवितांनी रसिकांना अक्षरशः वेड लावलं होतं. त्या काळात महादेवी वर्मा, सुमित्रानंदन पंत आणि रामधारीसिंग दिनकर यांसारख्या दिग्गज कवींना त्यांच्या कवितांमधून मद्याचा प्रसार करण्याबाबत आक्षेप असायचा. मधुशाला याचा अर्थ मद्य पिण्याची जागा. पण मधुशाला अर्थात मद्यालयाला एक प्रतीक मानून त्या उंचीवर पोहोचवणाऱ्या बच्चनजींनी स्वतः आयुष्यात कधीच मद्यपान केलं नाही ही बाब लक्षात घेण्याजोगी आहे.

बच्चन कुटुंबाच्या तीन पिढ्याः
हरिवंशराय, अमिताभ आणि अभिषेक



मधुशाला, मधुबाला आणि मधुकलश यांसारख्या काव्यसंग्रहांमधून त्यांनी मद्याचं महात्म्य वर्णन केलेलं नाही. तर उत्साह, आनंद आणि स्वप्नांची तरलता व्यक्त केली आहे. माणसाच्या आयुष्यात या गोष्टी कशा सुख आणि आशा घेऊन येतात त्याचं वर्णन या काव्यसंग्रहात आढळतं. गीतकार निदा फाजली आजही म्हणतात की, 'मी जेव्हा केव्हा उदास वा निराश होतो, तेव्हा मधुशाला काव्यसंग्रह वाचतो.'

जीवनाकडे बघण्याची एक नवी दृष्टी देणाऱ्या या महान कलाकृतींविषयी बेनीपुरी नावाच्या एका कविवर्यांच्या मनात इतका तिरस्कार होता की त्यांनी हरिवंशराय यांना जीवे मारण्याची धमकी दिली होती.

आयुष्य हे एखाद्या समरांगणासारखं असतं. तरीही ते आनंदाने जगा, त्यात आनंद शोधायला शिका असा संदेश आपल्या कवितांमधून देणाऱ्या हरिवंशरायजींनी यातल्या बऱ्याचशा कविता आपल्या खडतर जीवनाशी संघर्ष करताना लिहिल्या हे कितीजणांना ठाऊक आहे? त्यांच्या पहिल्या पत्नी श्यामा मृत्यूशी झुंज देत असताना पत्नीच्या उशाशी बसून बच्चनजींनी त्या लिहिल्या. हरिवंशराय आणि श्यामा यांच्या नऊ वर्षांच्या वैवाहिक जीवनात या जोडप्याने फक्त गरिबी, संघर्ष, आजारपणं आणि नैराश्यच पाहिलं. तरीही बच्चनजींच्या स्वभावातल्या कवीने उद्याची स्वप्नं पाहिली. यातूनही आपण बाहेर पडू असंच जणू ते कवितांमधून स्वतःला बजावत असावेत. बच्चनजी नेहमी म्हणत, 'कवीच्या व्याकुळ अंतःकरणातून कविता प्रसवते. म्हणूनच त्यात बेचैनी, व्याकुळता, मानसिक द्वंद्व, ईर्ष्या, वेदना, संघर्ष, कारुण्य या भावना प्रकर्षाने जाणवतात.' ते हसत हसत पुढे असंही म्हणायचे, 'कवीवर प्रेम करणं आणि त्याच्याशी लग्न करणं म्हणजे जिवंतपणी मरणाचा अनुभव घेण्यासारखं असतं.'

या मनस्वी कवीवर मनापासून प्रेम करणारी पण त्यांच्याशी विवाह नाकारणारीही एक स्त्री त्यांच्या जीवनात आली. तिचं नाव होतं आयरीस. कट्टर ख्रिस्ती कुटुंबातल्या आयरीसचं हरिवंशरायवर निस्सीम प्रेम होतं. पहिल्या पत्नीच्या वियोगानंतर हरिवंशराय यांच्या मनात चुकूनही पुनर्विवाहाचा विचार आला नव्हता. पण १९४०मध्ये आयरीस आयुष्यात आली आणि पुन्हा एकदा त्यांच्या भावना जाग्या झाल्या. मात्र लग्नानंतर हरिवंशरायनी ख्रिश्चन धर्म स्वीकारावा, असा विचित्र हट्ट आयरीसने धरला. धर्मपरिवर्तन कदापि शक्य नाही हे तिला ठणकावून सांगताना त्यांनी आयरीसला तिचा अखेरचा निर्णय विचारला. तिनेही स्पष्टपणे 'नाही' म्हटल्यावर पुन्हा एकदा हरिवंशरायना वियोगाचं दुःख अनुभवावं लागलं.

लागोपाठच्या या दोन दुःखद आठवणींनी होरपळलेल्या हरिवंशरायजींच्या मनावर हळुवार फुंकर घातली ती तेजी नावाच्या एका प्रेमळ तरुणीने.

हरिवंशराय आणि तेजी यांच्या मित्रमंडळींनी त्या दोघांना एकमेकांच्या सहवासात प्रयत्नपूर्वक आणलं. त्यांचं एकमेकांवर प्रेम बसावं आणि दोघांनी लग्न करावं हा त्यांना एकत्र आणण्यामागचा हेतू अखेर सफल झाला. ३१ डिसेंबर १९४० रोजी झालेल्या परिचयाचं रूपांतर २४ जानेवारी १९४१ रोजी विवाहात झालं.

पुढे तेजी बच्चन आणि इंदिरा गांधी या दोघींमध्ये गाढ मैत्री झाली. बच्चन आणि नेहरू घराण्यांना एकत्र आणण्याचं श्रेय सरोजिनी नायडूंना जातं. परिचय करून देताना सरोजिनी म्हणाल्या, 'हे आहेत कवी(बच्चनजी) आणि ही त्यांची कविता(तेजी).

केंब्रिज युनिव्हर्सिटीतून इंग्रज कवी यीट्सवर डॉक्टरेट मिळवणाऱ्या बच्चनजींचं आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे इंग्रजी, हिंदी या दोन भाषांइतकंच स्थानिक भाषेवरही त्यांचं प्रेम होतं. त्या भाषेत काव्यलेखन करण्यातही त्यांची हातोटी दिसून येते. 'रंग बरसे भिगे चुनरवाली रंग बरसे...'(*सिलसिला*) आणि 'मेरे अंगने में तुम्हारा क्या काम है...'(*लावारिस*) सारख्या गीतांमधून जाणकारांना त्याची सहज प्रचीती येते.


हरिवंशराय यांचं आत्मचरित्र चार भागांत प्रकाशित झालंय. कवी म्हणून मान्यता पावलेल्या हरिवंशरायजींचं हे गद्य लेखनही हिंदी साहित्यातील श्रेष्ठ कलाकृती ठरली. याच्या पहिल्या भागाचं शीर्षक आहेः क्या भुलू, क्या याद करू...

त्यांच्या अनुभवसमृद्ध जीवनाविषयी बोलतानाही आपल्याला असाच प्रश्न पडतो. काय विसरायचं, काय लक्षात ठेवायचं...!

□ **दीपक सोलिया**



मित्रांनी तेजी आणि हरिवंशराय यांना प्रेमात पाडून विवाहबंधनात अडकवण्याच्या हेतूनेच जवळ आणलं.



तेजी, जया, हरिवंशराय आणि अमिताभः सुखी कुटुंब